# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## Maharashtra Prathamik Shikshan Parishad

(Govt. of Maharashtra Undertaking)


जा.क्र.मप्राशिप/सशिअ/प्रशिक्षण/२०१३-१४/ 4400 दिनांक : 30 OCT 2013

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद - नाशिक, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, जालना, रत्नागिरी, ठाणे, रायगड, लातूर.

२) शिक्षणाधिकारी (प्राथ. व माध्य)
जिल्हा परिषद - नाशिक, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, जालना, रत्नागिरी, ठाणे, रायगड, लातूर.

३) शिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी
महानगरपालिका - नाशिक, औरंगाबाद, ठाणे.

४) शिक्षण निरिक्षक,
शिक्षण निरिक्षक यांचे कार्यालय,
उत्तर, दक्षिण, पश्चिम विभाग

विषय : राज्यातील सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये विपश्यना साधना प्रशिक्षणाचा मित्र उपक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना सन २०१३-१४

संदर्भ : १) परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि-३ दि. ०५/१०/२०११
२) परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि-३ दि. २७/०१/२०१२
३) परिपत्रक क्र. संकीर्ण २०१२/विपश्यना/१५क(८)/६६०१/
४) मप्राशिप परिपत्रक क्र.मप्राशिप/सशिअ /सकाअ/२०१३-१४/१५०७ दिनांक १८/०४/२०१३

संदर्भ क्रमांक ४ अन्वये वरील विषयाबाबत विस्तृत सूचना वितरीत करण्यात आलेले आहेत. याअनुषंगाने विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूटमार्फत आपल्या जिल्हयासाठी दिनांक २२

\\Paresh\suvarnasg\Anjali\letter0110.docx




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

जानेवारी, २०१४ ते २ फेब्रुवारी, २०१४ या दरम्यान ५० पुरुष व ५० महिला एकूण १०० शिक्षकांकरिता धम्मगिरी, इगतपुरी, नाशिक(०२५५३२४४०७६), (०२५५३२४४०८६) येथे विशेष विपश्यना शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

| दिनांक | जिल्हा | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | नाशिक | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | उसमानाबाद | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | बीड | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | औरंगाबाद | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | जालना | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | रत्नागिरी | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | रायगड | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | ठाणे | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | मुंबई महानगरपालिका | ५० | ५० | १०० |
| दि. २२/०१/२०१४ ते दि. ०२/०२/२०१४ | लातूर | ५० | ५० | १०० |

तरी वरीलप्रमाणे सर्वात जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेतील शिक्षकांस प्राधान्य देऊन सदर प्रशिक्षणास पाठवावे तसेच पुढीलप्रमाणे विशेष सुचनांचा अवलंब करावा.

१) संपूर्ण प्रशिक्षणाचा कालावधी १२ दिवसांचा आहे १२ व्या दिवशी सकाळी ६.३० वाजता प्रशिक्षण संपेल.

२) पहिल्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत शिबीरास पोहचणे आवश्यक आहे.

३) १२ व्या दिवशी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मित्र उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आनापाना ध्यानसाधनेबद्दल कार्यशाळा घेतली जाईल.

४) शिबीर केंद्रावर निवास, भोजन, ध्यान, साधना इत्यादी बाबतची परिपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.

५) सैल कपडे, मुखमार्जन साहित्य, साबण आदि अत्यावश्यक वैयक्तीक साहित्य प्रशिक्षणार्थीना सोबत आणावयाचे आहे.

६) निवास स्थळी मोबाईल, पेन, कागद, पुस्तके अथवा ध्यान साधनेपासून चित्त विचलीत करणारे कोणतेही साहित्य प्रशिक्षणार्थीला सोबत बाळगता येणार नाही.

७) हे साहित्य प्रशिक्षण आयोजकाकडे शिबीर कालावधीत सुरक्षित ठेवण्याकरिता जमा करण्याची व्यवस्था केलेली आहे.

८) विपश्यना शिबीर केंद्राच्या आचारसंहितेबाबतची माहिती http://www.vridhamma.org/Code-of-Discipline या वेबसाईटवर ठेवण्यात आली आहे. वरील आचार संहिता काळजीपूर्वक अभ्यासून त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थीनी आपले आचरण ठेवणे बंधनकारक आहे. याबाबतची विस्तृत माहिती वेबसाईट www.vridhamma.org वर उपलब्ध आहे.

९) आचार संहितेमध्ये प्रामुख्याने शिबीर तारखेच्या पूर्व संध्येपासून (रात्री ८.०० पासून) अंतीम दिवसापर्यंत मौन पाळणे आवश्यक आहे.

१०) प्रशिक्षण स्थळी आचार्य देतील त्या सूचनांचे काटेकोर पालन प्रशिक्षणार्थ्यांना करावे लागेल.

११) प्रशिक्षण कालावधीमध्ये शांततेचे सर्व कार्यक्रमात शिस्तीचे व शांततेचे पालन करणे आवश्यक आहे.

१२) प्रशिक्षण झालेल्या व्यक्ती वगळून इतर व्यक्ती प्रशिक्षणासाठी पाठविण्यात याव्यात.

१३) आपल्याकडे उपलब्ध तरतूदीनुसार प्रशिक्षणार्थीची संख्या ठरवावी.

१४) उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी तसेच प्रति प्रशिक्षणार्थी रु.२००/- प्रति दिन याप्रमाणे झालेल्या खर्चाची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ मध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करावी.

१५) यादी प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रशिक्षणाधिकारी प्रति दिन प्रति व्यक्ती रु. २०० याप्रमाणे १० दिवसाकरीता रु.२०००/- देणगी विपश्यना ध्यानसाधना केंद्रास देण्यात यावी.

१६) सदरील देणगीची रक्कम सर्व शिक्षा अभियांनातर्गत उपलब्ध व्यवस्थापन या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून अथवा शिक्षक प्रशिक्षणाअंतर्गत शिल्लक तरतूदीमधून धनादेशाद्वारे संबंधित प्रशिक्षण केंद्रास अदा करावा. या शिर्षाखाली रक्कम शिल्लक असल्याची खात्री करण्यात यावी.

१७) प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र परिशिष्ट - ब प्रमाणे शिक्षकांना देण्यात यावे.

१८) प्रशिक्षणाकरिता उपस्थित शिक्षकास/अधिकाऱ्यास नियमाप्रमाणे प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

१९) विपश्यना साधना केंद्राने प्राप्त देणगी मुल्यांची पावती शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना देण्यात यावी.

२०) इतर कोणत्याही माहितीसाठी मित्र उपक्रम मुंबई मो.९३२०५६८६२५, ९६९९१२३१४१ या क्र. वर संपर्क साधावा.

30.10

**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

\\Paresh\suvarnasg\Anjali\letter0110.docx